# नाईक फार्मसी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू

**नवीन नाशिक (प्रतिनिधी) :-** आजची पिढी वेगवान असण्यासोबतच स्मार्ट आहे. या कौशल्याचा उपयोग ते व्यवहारात देखील करीत असतात. आतापर्यंत घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थी कशा प्रकारे करतो त्यावर त्याचे भवितव्य अवलंबून असते आणि असेच विद्यार्थी यशस्वी होत असतात, असे प्रतिपादन क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे सहचिटणीस ॲड. तानाजी जायभावे यांनी केले.

महाविद्यालयातील कॅम्पस इंटरव्ह्यूचे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते बोलत होते. या कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी मेडप्लस फार्मा कंपनीने २२ विद्यार्थ्यांची निवड केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश दरेकर यांनी औषधनिर्माण क्षेत्रातील संधी आणि आव्हाने याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, औषधनिर्माता, कस्टमर सर्व्हिसेस असोसिएट्स आदी पदांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. मेडप्लस कंपनीद्वारे टेरिटरी मॅनेजर अमर बारापात्रे व पॅनल मेंबर प्रथमेश लोखंडे यांनी मुलाखत प्रक्रिया पार पाडली. त्याचे नियोजन महाविद्यालयाचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट डिपार्टमेंट चे समन्वयक प्रा. अमोल पाटील यांनी केले होते. कु. स्नेहा वाघ यांनी सूत्रसंचालन केले. निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, पंढरीनाथ थोरे, उपाध्यक्ष ॲड. पी. आर. गिते, सरचिटणीस हेमंत धात्रक, सर्व विश्वस्त पदाधिकारी व संचालकांनी अभिनंदन केले.

दै. भ्रमर - 01/03/2023.

04/03/2023